**कृषी आयुक्तालय**

**महाराष्ट्र राज्य पुणे-४११००५**

**जाक्र/कृआ/कृप-१३१८/गट-क/सरळसेवा/२९८७६/आस्था-४/२०२३**

**दिनांक-१३/०९/२०२३**

---

## परिपत्रक

कृषी विभागातील कृषी आयुक्तालयाच्या अधिनस्त विविध विभागीय कृषी सहसंचालक कार्यालयाच्या आस्थापनेवरील भूतपूर्व दुय्यम सेवा निवड मंडळाच्या कक्षेतील (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील) गट-क संवर्गातील लघुटंकलेखक, लघुलेखक(निम्न श्रेणी), लघुलेखक (उच्च श्रेणी), सहायक अधीक्षक, वरिष्ठ लिपिक या पदांकरीता जाहीरात दि. ३ एप्रिल, २०२३ ते ६ एप्रिल, २०२३ रोजी प्रसिद्ध झालेली होती. सदर जाहिरातीस अनुसरुन उमेदवारांचे अर्ज प्राप्त झालेले आहेत. त्यानुषंगाने ऑनलाईन परीक्षा दिनांक. २१, २२ व २५ सप्टेंबर, २०२३ रोजी राज्यातील नेमून दिलेल्या परीक्षा केंद्रावर आयोजीत करण्यात आलेली आहे.

सदर परीक्षेसाठी उपलब्ध परीक्षा केंद्र व तेथे उपलब्ध बैठक व्यवस्था याचा विचार करुन काही परीक्षा केंद्राची निवड केलेल्या उमेदवारांना त्यांच्या नजीकच्या जिल्हयातील परीक्षा केंद्राचे वाटप करण्यात आलेले आहे, याची कृपया उमेदवारांनी नोंद घ्यावी.

उपरोक्त जाहिरातीस अनुसरुन अर्ज केलेल्या उमेदवारांनी त्यांचे प्रवेश पत्र (Hall Ticket) कृषी विभागाच्या www.krishi.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर दिलेल्या link (लिंक) वरुन डाऊनलोड करुन घ्यावेत. उमेदवारांसाठी परीक्षेचे स्वरुप व इतर बाबींच्या अनुषंगाने माहिती पुस्तिका विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली असून सदर उमेदवारांनी माहिती पुस्तिका डाऊनलोड करुन माहिती पुस्तिका व प्रवेशपत्रावरील सूचनांचे काळजीपुर्वक वाचन करुन तंतोतंत पालन करावे.

(ज्ञानचंद्र गित्ते)
**वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी**
**कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे**